## निवडक



### शुभदा पटवर्धन यांनी योगासने सादर करून दिला प्रेरणेचा संदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ११ :** महिला दिन सप्ताहाच्या निमित्ताने योगासना स्पोर्ट्स असोसिएशन गोवा व स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय योगासना स्पर्धेत ७४ वर्षीय शुभदा पटवर्धन यांनी आपल्या उत्कृष्ट योगासन सादरीकरणाने सर्वांना प्रेरित केले.

योगाभ्यास आणि निरोगी जीवनशैलीचे उत्तम उदाहरण ठरत, वरिष्ठ गटात शुभदा पटवर्धन यांनी दुसरा क्रमांक पटकावला. त्यांचे शुद्ध, समतोल आणि प्रभावी योगासन पाहून उपस्थित प्रेक्षक आणि सहभागी स्पर्धक भारावून गेले. वयोमान कितीही असो, इच्छाशक्ती आणि नियमित सराव असल्यास शरीर लवचिक आणि सक्षम राहू शकते, हे त्यांनी आपल्या सादरीकरणातून दाखवून दिले. या स्पर्धेत विविध वयोगटांतील साधकांनी चमकदार कामगिरी केली. ३५ ते ४५ वर्षे वयोगटात निष्का सावंत हिने तृतीय क्रमांक पटकावला. ४५ ते ५५ वर्षे वयोगटात शिल्पा लिंगुडकर हिने प्रथम, हेमा चोपडेकर हिने द्वितीय, आणि अश्विनी मंजू हिने तृतीय क्रमांक मिळवला. ५५ वर्षे व त्यापुढील वयोगटात ६० वर्षीय रोहिणी पेडणेकर यांनी प्रथम, तर ७४ वर्षीय शुभदा पटवर्धन यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. स्पर्धेत केवळ विजेतेच नव्हे, तर सहभागी साधकांचाही महत्त्वपूर्ण सहभाग होता. योगिता चारी, सिद्धी गुणाजी, अश्विनी पटवर्धन, रेश्मा रावळ, राखी मुरुडकर आणि अंकिता म्हमळ यांनी आपले कौशल्य सादर करून स्पर्धेचे महत्त्व वाढवले. या भव्य स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामध्ये महिला पतंजली योग समितीच्या कार्यकर्त्यांची मोठी भूमिका होती. सुलोचना बाराजणकर यांनी संयोजनात मोलाची मदत केली, तर गौरी देवारी यांनी तांत्रिक समितीच्या सदस्य म्हणून महत्त्वाचे योगदान दिले. या स्पर्धेला महिला पतंजली योग समितीच्या राज्याध्यक्ष संध्याताई खानोलकर यांची उपस्थिती लाभली. त्यांनी विजेत्यांचे अभिनंदन करत योगासनाच्या सातत्यपूर्ण सरावाचे महत्त्व अधोरेखित केले. योगासन केवळ शरीराला लवचिक ठेवण्यासाठी नव्हे, तर मन आणि आत्मा सुदृढ ठेवण्यासाठीही महत्त्वाचे आहे. योग्य आहार, सकारात्मक विचारसरणी आणि नियमित योग सरावामुळे कोणतेही वय अडथळा ठरत नाही. त्यांची जिद्द आणि समर्पण सर्वांना योगाकडे वळण्याची नवी प्रेरणा देईल, यात शंका नाही!

### मानिनी सेल्फ हेल्प ग्रुपतर्फे जागतिक महिला दिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ११ :** प्रतिभावान महिलांची सृजशीलता, समर्पण आणि कलागुण या त्रिवेणी संगमातून नाईक नगर डिचोली येथील मानिनी सेल्फ हेल्प ग्रुपतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त श्री सिद्धिविनायक मंदिरात महिला दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच मानिनी सेल्फ हेल्प ग्रुपचा सहावा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात नारळाच्या तंतू पासून विविध वस्तू तयार करण्याची चार दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. त्यात प्रशिक्षिका म्हणून बबीता सुर्लेकर होत्या. जागतिक महिला दिनानिमित्त कार्यशाळेत तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून लालन मडकईकर उपस्थित होत्या. याप्रसंगी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात रुक्मिणी चेंदवणकर हिने गणेश वंदना (भरत नाट्यम) सादर केली.जान्हवी रामकृष्ण गर्दे यांनी कविता सादर केली. शुभांगी नरहरी पत्की यांनी मोनोलॉग सादर केला. गौरी गर्दे कथने यांनी कविता सादर केली. लालन मडकईकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून मानसिक स्वास्थ्य विषयी उद्बोधन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मानिनी सेल्फ हेल्प ग्रुपच्या अध्यक्षा लोचन गोसावी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सायली रामकृष्ण गर्दे यांनी केले. शिवानी टोपले यांनी सर्वांचे आभार मानले.

### हरमल येथे २८ रोजी मिरची संघटनेची बैठक


■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ११ :** येथील जीआय मानांकन नोंदणीकृत मिरची संघटनेची बैठक शुक्रवार दि. २८ रोजी सकाळी १०.३० वाजता हरमल पंचायत सभागृहात होणार असल्याचे सचिव दत्ताराम पार्सेकर यांनी कळविले आहे. या बैठकीत संस्थेच्या स्थापनेपासूनचा जमा खर्च सादर करणे, नवीन कार्यकारिणीची निवड,नाबार्डच्या सहकार्याने योजनाबाबत चर्चा व अध्यक्षाच्या परवानगीने उपस्थित विषयावर चर्चा करण्यात येणार आहे. या बैठकीस जीआय मानांकनचे अधिकारी दीपक परब उपस्थित राहणार आहेत. तरी संघटनेच्या सदस्यांनी उपस्थित राहून चर्चेत सहभाग घ्यावा व संघटनेचे कार्य पुढे न्यावे असे आवाहन सचिव पार्सेकर यानी केले आहे.

# गावातील मंदिरे मानवी जीवन समृद्ध करतात

## मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत : न्हावेली साखळी येथील लक्ष्मीनारायण देवस्थानतर्फे सन्मान सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड



न्हावेली : स्मरणीकेचे प्रकाशन करताना डॉ. प्रमोद सावंत. बाजूला मान्यवर.

**डिचोली, दि. ११ :** देव, देश आणि धर्मासाठी शतकांनुशतके पिढ्यानंपिढ्या काम चालू असून मंदिरेही आमच्या संस्कृतीची संचिते आहेत. हजारो वर्षांपूर्वीची मंदिरे आजही आम्हाला प्रेरणा देत असून गावागावात असलेले मंदिरे मानवी जीवन समृद्ध करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

तांबडी सूर्ला येथील श्री महादेवाचे मंदिर १३व्या शतकातील असून ते पोर्तुगीज शासन काळातली सुरक्षित राहिले आणि न्हावेलीच्या ग्रामस्थांनी गोव्यातील एक सुदंर मंदिर उभारले असून हे आगळे वेगळे मंदिर अनेक वर्षे एकतेचे प्रतिक बनून राहील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले. न्हावेली साखळी येथील श्री लक्ष्मी नारायण मंदिर उभारणी त योगदान दिलेल्या मान्यवरांचा सन्मान सोहळ्यात ते बोलत होते.

आज एकविसाव्या शतकात संघटितपणे सर्वांच्या सहकार्याने मंदिर साकार करण्याचे काम न्हावेली साखळी येथील श्री लक्ष्मी नारायण देवस्थान समिती आणि गावातील लोकांनी करून दाखवले आहे. त्यासाठी ते अभिनंदनास पात्र ठरत आहे, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले व शुभेच्छा दिल्या..

यावेळी, वेदांतचे सीईओ सप्तेश सरदेसाई, फोमेंतो कंपनीचे राजीव कुमार, सरपंच रोहिदास कानसेकर, देवस्थान अध्यक्ष ॲड. प्रेमानंद गावस, चंद्रकांत गावस, आनंद गावस, विनायक गावस उपसरपंच कल्पना गावस, आदी मान्यवर उपस्थित होती.

सप्तेश सरदेसाई यांनी हे ऐतिहासिक मंदिर गावाच्या ऐकतेचे प्रतीक असून त्याची रचना सुबक आहे, असे स्पस्ट केले. अध्यक्ष प्रेमानंद गावस यांनी उपस्थितांना देवस्थान बांधणी विषयी सविस्तर माहिती दिली. सर्वांच्या सहकार्यामुळे हे मंदिर शक्य झाल्याचे सांगितले. यावेळी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते मंदिर बांधणीत विशेष सहकार्य देणाऱ्याचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी देवस्थान समितीतर्फे काढण्यात आलेल्या स्मरणीकेचे प्रकाशन मुख्यमंत्री व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विठ्ठल गावस हे ही उपस्थित होते. त्यांनी स्मरणीके संदर्भात माहिती दिली. यावेळी कंत्राटदार संतोष जाधव यांचा सन्मान करण्यात आला. मुख्यमंत्री डॉ सावंत यांचा सत्कार मंदिर उभारणीत आपले बहुमोल योगदान देणाऱ्याव सर्व प्रकारचे सहकार्य करणारे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचा ज्येष्ठ नागरिक नारायण गावस यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविद भगत यांनी केले.



कामुर्ली : प्रमुख पाहुणे नीलकंठ हळर्णकर यांच्यासोबत डॉ. प्रदीप कोरगावकर, डॉ. नूतन बिचोलकर, डॉ. दिगंबर नाईक, नीलकंठ हळरणकर, प्रा. सुभाष कौठणकर, पाठीमागे उभे इतर डॉक्टर, सरपंच, उपसरपंच, पंच व इतर

## कामूर्ली येथील आरोग्य शिबिरास प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ११ :** इंडियन रेड क्रॉस सोसायटी बार्देश शाखा व कामूर्ली ग्राम पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने कामूर्ली पंचायत सभागृहात आयोजित केलेल्या आरोग्य शिबिराला ग्रामस्थांचा उत्तम प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्घाटन थिवी मतदारसंघांचे आमदार तथा मसचीमार मंत्री नीलकंठ हळरणकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर इंडियन रेड क्रॉस सोसायटी बार्देश शाखेचे अध्यक्ष प्रा. सुभाष कौठणकर, डॉ. दिगंबर नाईक, डॉ. प्रदीप कोरगावकर, डॉ. नूतन बिचोलकर, सरपंच लक्ष्मण नाईक, उपसरपंच संगीता पेडणेकर, पंच सदस्य धर्मेंद्र परब, रंजना नाईक गांवकर, पांडुरंग खोरजुवेकर, मेहबूब विराणी व इतर मान्यवर उपस्थित होते.

नीलकंठ हळरणकर यांनी रेड क्रॉसच्या कार्याचे कौतुक केले. तसेच कामूर्ली पंचायतने ग्रामस्थ्यांच्या सोयीसाठी आरोग्य शिबिर गावात घडवून आणल्या बद्दल पंचायतचे अभिनंदन केले. या शिबिराचा ग्रामस्थांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले. प्रा. सुभाष कौठणकर यांनी रेड क्रॉस सोसायटीच्या कार्याची माहिती दिली.

शिबिरात डॉ. दिगंबर नाईक, डॉ. प्रदीप कोरगावकर, डॉ. सचिन गोवेकर, डॉ. नूतन बिचोलकर, डॉ. श्रेयश बिचोलकर, डॉ. अमोघ बुडे, डॉ. मंजिता च्यारी, डॉ. संदीप राजलबंदी, ऐश्वर्या मालवणकर, प्रदीप राठोड, शुभम कळंगुटकार, शरद विनजमेकर, फर्मासिस्ट अंकित बत्रा, पांडुरंग नाईक व मिहीर च्यारी यांनी ग्रामस्थाना मोफत सेवा दिली. एकूण १३४ ग्रामस्थानी शिबिराचा लाभ घेतला. शिबिरात औषधें मोफत देण्यात आली. लक्षिमन नाईक यांनी आभार मानले.

## फोंड्यात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या कवितांना उजाळा

■ टीम दैनिक हेराल्ड



फोंडा : मराठी भाषा निमित्त आयोजित खास कार्यक्रमात डॉ. बिभिषण सातपुते, लक्ष्मी जोग, डॉ. अनीता तिळवे, यांच्यासह साहित्यिक

**फोंडा, दि. ११ :** कविवर्य कुसुमाग्रज यांनी साहित्यातील कथा, कादंबरी, नाटक, निबंध, असे सर्व प्रकारचे साहित्य उत्तम रितीने हाताळले. असे उद्गार डॉ. बिभिषण यांनी फोंडा येथील राजदीप गॅलरिया येथे मराठी भाषा निमित्त आयोजित खास कार्यक्रमात अध्यक्षपदावरून बोलताना काढले. साहित्यलेणी प्रतिष्ठान तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होतेज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मी जोग म्हणाल्या, मराठीतूनच बोलायची सवय लावा तरच नव्या पिढीला मराठीची सवय लागेल.

डॉ. अनीता तिळवे यांनी कुसुमाग्रज व सावकार यांच्या जिवनकार्याची माहिती दिली.ज्येष्ठ कीर्तनकार सुहासबुवा वझे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. ज्येष्ठ नाट्यकर्मी नितिन कोलवेकर यांनी नटसम्राट मधील स्वगत सादर केले. विश्वनाथ जोशी यांनी कुसुमाग्रजांनी अनुवादीत केलेली मेघदूतातील काही श्लोक सादर केले.दया मित्रगोत्री, बिभीषण सातपुते, कविता आमोणकर, नूतन दाभोळकर, दीपा मिरिंगकार, अनंत काजरेकर, सचिन मणेरीकर, मंजिरी वाटवे, डॉ. अनीता तिळवे , महेश पारकर, माधुरी उसगावकर, वसुधा तारी, बबीता नार्वेकर, रेशम झारापकर, प्रकाश क्षीरसागर, श्रुती हजारे यांनी कुसुमाग्रजांच्या कविता सादर केल्या.

## वेशभूषा स्पर्धेत तक्ष, दक्ष, दुर्वा, श्रुती, दीप प्रथम



इब्रामपूर : कार्यक्रमात उपस्थित आत्माराम गावकर, सरपंच अशोक धाउसकर, दीपक शिरोडकर, सुभाष सावंत, मुख्याध्यापिका वंदना कळंगुटकर व डॉ. उदय कुडाळकर.

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ११ :** सरकारी प्राथमिक विद्यालय इब्रामपुर व मातृछाया पूर्व प्राथमिक विद्यालय इब्रामपूर येथे माऊली क्रिएशन्स इब्रामपूर व गोमंतक मराठी अकादमी पर्वरी यांच्या सौजन्याने शिवकालीन विषयावर वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली.

त्यावेळी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आत्माराम गावकर, इब्रामपूर गावचे सरपंच श्री .अशोक धाउसकर, माऊली क्रिएशन इब्रामपूरचे अध्यक्ष दीपक शिरोडकर, सम्राट पंचक्रोशीचे अध्यक्ष सुभाष सावंत, सरकारी प्राथमिक विद्यालय इब्रामपूरच्या मुख्याध्यापिका वंदना कलंगुटकर, डॉ. उदय कुडाळकर इब्रानपूर गावचे माजी सरपंच चंद्रशेखर खडपकर उपस्थित होते. या कार्यक्रमावेळी शिवकालीन विषयावर मुलांनी नृत्य सादर केले. तसेच शिवकालीन विषयावर वेशभूषा स्पर्धेत मातृछाया पूर्व प्राथमिक विद्यालयाच्या बालवर्ग एक मधून पहिले बक्षीस तक्ष गवस, दुसरे बक्षीस श्रेया नाईक, तर तिसरी बक्षीस सौख्यदा तिवरेकर हिला प्राप्त झाले.

तसेच बालवर्ग दोन मधून पहिले बक्षीस दक्ष पवार, दुसरे मिथिल शिंदे, तर तिसरे बक्षीस रितेशा कामात हिला मिळाले. इयत्ता पहिली मधून पहिले बक्षीस वेद धाऊसकर व दूर्वा सावंत, दुसरे बक्षीस चिन्मय गवस व तिसरी नित्या गवस हिला प्राप्त झाले. इयत्ता दुसरी मधून पहिली बक्षीस श्रुती सावंत, दुसरे कनिषा शिंदे, तर तिसरे बक्षीस मोहनिश धाउस्कर याला प्राप्त झाले. तर इयत्ता तिसरी मधून पहिले बक्षीस दीप गवस, दुसरे आदिश्री नाईक व तिसरे प्रया खेडेकर हिला प्राप्त झाले. इयत्ता चौथी मधून आयुष शिरोडकर याला पहिले बक्षीस मिळाले. तर स्वरा गवस हिला दुसरे बक्षीस प्राप्त झाले व तिसरे बक्षीस उर्वी नाईक हिने पटकावले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी स्नेहा देसाई हिने केले.

## सरकारी प्राथमिक विद्यालय मोरजीत बाल क्रीडा महोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. ११ :** सरकारी प्राथमिक विद्यालय देऊळवाडा मोरज या विद्यालयात बाल क्रीडा महोत्सव साजरा करण्यात आले. स्थानिक पंच मुकेश गडेकर यांच्या हस्ते या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा ससुनयना शेट्ये, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा दीपिका शेटगावकर, माजी अध्यक्ष भिकाजी गोवेकर, शाळेचे मुख्याध्यापक सोमनाथ शेटमांद्रेकर, शिक्षिका संगीता ठाकूर, पूर्व प्राथमिक विभाग शिक्षिका रजनी विठ्ठल शेटगावकर, सुजता पाटील, विष्णू परब, गणेश शेटगावकर, सुरेखा शेटगावकर, महादेव अनंत गाडगीळ पालक व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. शाळेतील मुलांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या पूर्व प्राथमिक विभागासाठी १५ मीटर धावणी, लिंबू चमचा शर्यत, कार्डबोर्ड धावणी, बटाटे शर्यत व रिले, प्रार्थमिक विभाग ५० मीटर धावणे, १०० मीटर धावणी, चेंडू फेक, लांब उडी वरील स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच महिला दिनानिमित्त महिलांसाठी लिंबू चमचा शर्यत व बटाटे शर्यत घेण्यात आली.

पूर्व प्राथमिक विभाग १५ मिटर धावणे – प्रथम – श्रेया शेटगावकर व कुश्मीता महानता, द्वितीय – मयंक चौरसिया व मयंक कुमार, तृतीय–प्रांजल बराईक, सौम्या कुमार. लिंबू चमचा शर्यत– प्रथम श्रेया शेटगावकर व सिफा खान, द्वितीय प्रियंका लमाणी व सौम्या कुमारी, तृतीय भार्गवी शेटगावकर. कार्डबोर्ड रेस – प्रथम प्रियंका लमाणी व खुशीमिता महानता, द्वितीय श्रेया शेटगावकर व सौम्या कुमारी, तृतीय–प्रियंका लमाणी व मानवी कुमार. रिले रे – प्रथम गट – श्रेया शेटगांवकर, शमशाद संदी, प्रांजल चिक बराईक, भार्गवी शेटगावकर, द्वितीय गट – खुश्मीता महानता, सौम्य कुमारी, प्रियंका लमाणी. बटाटे शर्यत – प्रथम मयंक चौरसिया व कुश्मिता महानता, द्वितीय श्रेया शेटगावकर व मयंक कुमार, तृतीय – प्रियंका लमाणी व स्नेहल मंदीगीनी.

प्राथमिक विभाग – ५० मीटर धावणी – (मुलगे) प्रथम प्रतिक बराईक, द्वितीय – योगेश लमाणी, तृतीय विघ्नेश शेट्ये. ५० मीटर धावणे (मुली) – प्रथम सानवी शेटगावकर , द्वितीय– पूर्वी सिंग कुशवा, तृतीय – नयना संदी. १०० मीटर धावणे (मुलगे)– प्रथम प्रतीक बडाईक, द्वितीय योगेश लमाणी आणि तृतीय विघ्नेश शेट्ये. १०० मीटर धावणे (मुली) प्रथम पूर्वी कुशवा, तृतीय सानवी शेटगावकर, तृतीय – नयना संधी. चेंडू फेक (मुली) प्रथम प्रतिक बराईक, द्वितीय विघ्नेश शेट्ये, तृतीय योगेश लमाणी. चेंडू फेक (मुली) प्रथम पूर्वी कुशवा, द्वितीय रीफा खान, तृतीय सानवी शेटगावकर, लांब उडी (मुलगी )प्रथम – प्रतीक बराईक, द्वितीय योगेश लमाणी, तृतीय विघ्नेश शेट्ये. लांब उडी (मुली) – प्रथम पूर्वी कुशवा, द्वितीय सानवी शेटगावकर, तृतीय नयना संधी. रिले प्रथम गट – सानवी शेटगावकर, पूर्वी कुशवा, रिफा खान, नयना संधी. द्वितीय गट–प्रतीक बराईक, योगेश लमाणी, विघ्नेश शेट्ये, सदानंद पाटील, महिला दिनानिमित्त महिलांसाठी लिंबू चमचा शर्यत व बटाटे शर्यत घेण्यात आली. लिंबू चमचा शर्यत – प्रथम सीता बराईक, द्वितीय राखी कुमार, बटाटे शर्यत – प्रथम लता कुमारी, द्वितीय नीला लमाणी, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा – सुनयना शेट्ये, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा दीपिका शेटगावकर, सुरेखा शेटगावकर, विष्णू परब, गणेश शेटगांवकर, माजी अध्यक्ष, भिकाजी गोवेकर, सुरेखा शेटगांवकर यांच्या हस्ते सर्व विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.




पणजी : बाळ्ळी येथील सरकारी माध्यमिक शाळेला चॅम्पियन स्कूल पुरस्कार प्रदान मान्यवर.

## देश अपनाए संस्थेचा पुरस्कार वितरण समारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** 'देश अपनाएं' सहयोग फाउंडेशन'ने गोव्यातील विविध शाळांमध्ये नागरिकत्व शिक्षण व नागरी सहभाग कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे.

या उपक्रमाचा उद्देश देशभक्तीची भावना वाढवणे, जबाबदार आणि उत्तरदायी नागरिक घडवणे आणि युवकांमध्ये देशासाठी मालकीभाव निर्माण करणे हा आहे. शुक्रवारी पणजीत या फाउंडेशनतर्फे आयोजित कार्यक्रमात राज्यभरातील विविध शाळांचे विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी होते. यावेळी फाउंडेशनतर्फे विविध शाळांना पुरस्कार देण्यात आले. विविध राज्यांत मोहीमनिखिल म्हात्रे म्हणाले, सध्या 'देश अपनाए' ७७ सरकारी, ३१५ अनुदानित आणि ९८ उच्च माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत आहे. तसेच मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकमधील हजारो शाळांमध्येही हा उपक्रम राबवला जात आहे. २०२१ पासून राज्यातील शाळांमध्ये हा उपक्रम राबविला जात आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये 'ॲक्टिझन' म्हणजेच जागरूक, माहितीपूर्ण आणि सक्रिय नागरिकत्वाची जाणीव निर्माण करतो. मुलांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना रुजविण्यासाठी हा कार्यक्रम मोफत राबविला जात आहे.शालेय स्तरावरील नागरिकशास्त्र शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी हा उपक्रम आहे.२०१५ मध्ये मुंबईतील शाळांमधून सुरू झालेल्या या उपक्रमाला मोठे यश मिळाले आहे. २०२१ मध्ये 'देश अपना येन' संस्थेने विविध शैक्षणिक संस्थांसोबत सामंजस्य करार करून हा उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्यास सुरुवात केली.कार्यक्रमाला एससीईआरटीच्या मेघना शेटगावकर, 'देश अपनाए सहयोग फाउंडेशन'चे डॉ. गोपला प्रधान आणि निखिल म्हात्रे उपस्थित होते. शेटगावकर यांनी मोहिमेविषयी अधिक माहिती दिली.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १८९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 189 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .